विक्रिकर निरीक्षक मुख्य परीक्षा - 2014

परीक्षा दि: 18-08-2015

पेपर-1

# A

CODE : **G06**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

**प्रश्नपुस्तिका-I**

**मराठी व इंग्रजी**

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

वेळ : 1 ( एक ) तास

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | ↑ शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. 'ळ' हा ध्वनी खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) मूर्धन्य (2) ओष्ठ्य (3) कंपनयुक्त (4) दंततालव्य

---

2. पुढीलपैकी कोणता गट समानार्थी शब्दांचा आहे ?

(1) कावळा, काक, पायस (2) नग, खग, विहग

(3) पय, उदक, सलिल (4) सुर, असुर, दानव

---

3. पर्यायी उत्तरातील 'संयुक्त वाक्य' कोणते ?

(1) मी चहा पितो म्हणून माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

(2) मी चहा पितो. माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

(3) माझे चहा पिणे माझ्या वडिलांना आवडत नाही.

(4) मी चहा पितो पण माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

---

4. 'मी ग्रंथ वाचत जाईन' या वाक्याचा काळ ओळखा.

(1) रीतिभूतकाळ (2) रीतिवर्तमानकाळ

(3) रीतिभविष्यकाळ (4) पूर्णरीतिभविष्यकाळ

---

5. 'तू कुत्र्याला मारलेस' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) कर्तृकर्मसंकर प्रयोग (2) कर्मभाव संकर प्रयोग

(3) कर्तृभाव संकर प्रयोग (4) कर्मणी प्रयोग

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

6. पुढे दिलेल्या म्हणींच्या गटातून अधिकांश साम्य असणारी जोडी पर्यायी उत्तरातून शोधा.

| अ | | ब | |
|---|---|---|---|
| (a) | मनच राजा मनच प्रजा | (i) | मनात एक अन जनात एक |
| (b) | मनात मनोरे पुढे ताट कोरे | (ii) | मनाला मानवेल तोच सौदा |
| (c) | मना एवढी ग्वाही त्रिभुवनात नाही | (iii) | मन चिंती ते वैरी न चिंती |
| (d) | मनच जाणे पाप | (iv) | मनात मांडे नि पदरात धोंडे |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) - (ii) (2) (b) - (iv) (3) (c) - (i) (4) (d) - (iii)

7. 'गावजेवण' हा पुढीलपैकी कोणता समास आहे ?

(1) षष्ठी तत्पुरुष (2) सप्तमी तत्पुरुष (3) चतुर्थी तत्पुरुष (4) पंचमी तत्पुरुष

8. पुढीलपैकी सिद्ध शब्दांचा गट कोणता ?

(1) कर, पाह, आण (2) करा, पाहणी, ने-आण

(3) बोलाचाली, जाऊन, येथून (4) चाल, आणणावळ, सुकर

9. 'काही क्रियाविशेषणे विकारी तर काही क्रियाविशेषणे अविकारी असतात' या विधानाबाबत खालील कोणता पर्याय योग्य आहे ?

(1) या विधानाचा पूर्वार्ध चूक आहे. (2) या विधानाचा उत्तरार्ध चूक आहे.

(3) हे संपूर्ण विधान चूक आहे. (4) हे संपूर्ण विधान बरोबर आहे.

10. खालील विधानातील अधोरेखित शब्द समुहाचे पर्यायी उत्तरातील योग्य पर्यायी उत्तर कोणते ?

'तो चोर <u>गाडी भरधाव घेऊन</u> पळाला'.

(1) मुख्य उद्देश्य (2) उद्देश्य विस्तार (3) मुख्य विधेय (4) विधेय विस्तार

11. 'कोळ्याने नदीत टाकलेल्या जाळ्यामध्ये भरपूर मासे आले'. या वाक्यातील कर्ता कोणता ?

(1) कोळी (2) जाळे (3) मासे (4) नदी

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

12. खालील पर्यायी उत्तरातील 'संकेतार्थी वाक्य' ओळखा.

(1) आजच्या जगात एकमेकांवर दया करणे महत्त्वाचे आहे.

(2) सर्वांनी दया करावी, असे मला वाटते.

(3) जर सगळेच दया दाखवतील तर जग सुखी होईल.

(4) जग सुखी होण्यासाठी थोड्या थोडक्याच लोकांनी दया दाखवून चालणार नाही.

---

13. विभक्ती प्रत्यय लागल्याने शब्दाच्या अंत्य अक्षरात विकार होण्याच्या क्रियेला काय म्हणतात ?

(1) सामान्यरूप (2) संधी (3) कारकार्थ (4) उपपदार्थ

---

14. 'प्रकारदर्शक रीतिवाचक क्रियाविशेषण' पर्यायी उत्तरातील कोणते ?

(1) आपोआप (2) खचित (3) चमचम (4) खरोखर

---

15. पर्यायी उत्तरातील गटाबाहेरचा 'शब्द साधित' शब्द कोणता ?

(1) कायिक (2) आनंदित (3) स्वकीय (4) नातेवाईक

---

16. खालील म्हण पूर्ण करा.

'उधार तेल ————'.

(1) जळकट (2) कळकट (3) खवट (4) मळकट

---

17. 'प्रवासभाड्यातील वाढीचा निषेध करण्यासाठी लोक <u>रस्त्यावर</u> उतरले'. अधोरेखित शब्दाचे वाक्यातील स्थान पुढीलपैकी कोणते आहे ?

(1) कर्मपूरक (2) आधारपूरक (3) विधिपूरक (4) विधेय

---

18. 'पाणक्या', 'गळेकापू' हे शब्द खालीलपैकी समासाच्या कोणत्या प्रकारातील आहेत ?

(1) उपपद तत्पुरुष (2) मध्यमपदलोपी (3) बहुव्रीही (4) अव्ययीभाव

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**19.** 'पिंजारी' या शब्दात पुढीलपैकी कोणता प्रत्यय आहे ?

(1) 'री' हा कर्तृवाचक प्रत्यय (2) 'आरी' हा कर्तृवाचक प्रत्यय

(3) 'ई' हा कर्तृवाचक प्रत्यय (4) 'आर' हा कर्तृवाचक व 'ई' हा लिंगदर्शक प्रत्यय

---

**20.** 'एस.डी. बर्मन यांच्या गाण्यांमधील माधुरी अवीट आहे.' या वाक्यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचा आहे ?

(1) भाववाचक नाम (2) विशेषनाम (3) विशेषण (4) क्रियाविशेषण

---

**21.** खालील शब्दातील योग्य वर्णरचना कोणती ?

'वृद्ध्यादेश'

(1) व् + ऋ + द् + ध + ई + आ + द् + ए + श् +अ

(2) व् + ऋ + द् + ध् + इ + आ + द् + ए + श् +अ

(3) व् + ऋ + द् + ध् + ई + अ + द + ए + श +अ

(4) व् + ऋ + द + ध + इ + अ + द + ए + श् +अ

---

**22.** 'तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार' - या ओळीतील 'तडिताघाते' याचा अर्थ.

(1) तडाखेदार वाराने (2) विजेच्या आघाताने (3) आसूडाच्या वाराने (4) तलवारीच्या वाराने

---

**23.** 'सानियाने स्पर्धाआधी खूप सराव केला. प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास केला.' यांचे केवल वाक्य पुढीलपैकी कशाप्रकारचे होईल ?

(1) सानियाने स्पर्धाआधी खूप सराव व्हावा, म्हणून प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास केला.

(2) सानियाने स्पर्धाआधी खूप सराव केला आणि प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास केला.

(3) जेव्हा सानियाने स्पर्धाआधी सराव केला, तेव्हा प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास केला.

(4) सानियाने स्पर्धाआधी प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास करून खूप सराव केला.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

24. पर्यायी उत्तरातील व्याकरणदृष्ट्या **योग्य** शब्द कोणता ?

(1) अभीनिवेश (2) अभीनीवेश (3) अभिनीवेश (4) अभिनिवेश

---

25. 'त्यांना शक्ती प्राप्त होवो' या वाक्यातील आख्यात ओळखा.

(1) विध्यर्थ (2) आज्ञार्थ (3) वाख्यात (4) ताख्यात

---

26. खालील वाक्यातील प्रयोग ओळखा -

'तू गाईला घालविलेस.'

(1) कर्म - भाव संकर प्रयोग (2) कर्तृ - कर्म संकर प्रयोग

(3) कर्तृ - भाव संकर प्रयोग (4) पुराण कर्मणी प्रयोग

---

27. 'मी तिला पाहिले. ती बाजारात भाजी घेत होती.' या वाक्यांचे मिश्र वाक्य कशाप्रकारे होईल ?

(1) बाजारात भाजी घेताना मी तिला पाहिले.

(2) मी तिला बाजारात भाजी घेत असलेली पाहिली.

(3) मी तिला पाहिले पण ती बाजारात भाजी घेत होती.

(4) जेव्हा मी तिला पाहिले, तेव्हा ती बाजारात भाजी घेत होती.

---

28. 'पादपूरणार्थक केवल प्रयोगी अव्यय' असलेले विधान पर्यायी उत्तरातील कोणते आहे ?

(1) रामराम काय हा प्रसंग (2) छे मी तसं कुठं काय म्हटले

(3) आणखीन काय बरे ते (4) वाहवा तू पैज जिंकलीस तर

---

29. खालीलपैकी कोणता शब्द लेखननियमानुसार **अचूक** आहे ?

(1) परिवर्तनियता (2) परीवर्तनियता (3) परिवर्तनीयता (4) परिवर्तर्नियता

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

30. 'धडाधड' हा शब्द, शब्दसिद्धीच्या कोणत्या उपप्रकारातील आहे ?

(1) प्रत्यय घटित (2) उपसर्ग घटित (3) अभ्यस्त (4) सामासिक

---

31. खालील वाक्यातील 'नकारार्थी वाक्य' कोणते ?

(1) तो घरी आल्याशिवाय राहाणार नाही. (2) काय म्हणता तो घरी खात्रीने येणार.

(3) अरेव्वा, शेवटी तो घरी आलाच. (4) तो घरी येणारच नाही.

---

32. 'कोण काय करणार आहे माझे ?' या विधानातील कोण हे सर्वनाम कोणती भावना व्यक्त करणारे आहे ?

(1) आश्चर्य (2) तुच्छता (3) अगतिकता (4) विलक्षणपणा

---

33. खालील पर्यायी उत्तरातील 'प्रश्नार्थक वाक्य' कोणते ?

(1) कालची किती ती गर्दी (2) कालची गर्दी नव्याने का सांगायला हवी.

(3) काल खूपच गर्दी होती. (4) काल गर्दी नव्हती असे नाही.

---

34. 'तिने सारे धान्य निवडून ठेवले'. यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचा आहे ?

(1) सिद्ध क्रियाविशेषण अव्यय (2) अव्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय

(3) प्रत्ययसाधित क्रियाविशेषण अव्यय (4) धातुसाधित क्रियाविशेषण अव्यय

---

35. 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक अतिशय गुंतागुंतीचे गणित सोडविण्यास दिले.' अधोरेखिताचे वाक्यातील स्थान पुढीलपैकी कोणते ?

(1) विधेयपूरकाचा विस्तार (2) विधिपूरकाचा विस्तार

(3) कर्मपूरकाचा विस्तार (4) उद्देश्य विस्तार

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

36. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात सांगा.

'त्याच्या बोलण्यात <u>परंतुचा</u> वापर फार होतो'.

(1) केवलप्रयोगी अव्यय (2) नाम (3) सर्वनाम (4) विशेषण

---

37. '__________ वास उन्हाळ्यात थंडावा देतो'. गाळलेल्या शब्दाच्या जागी पुढीलपैकी कोणता पर्याय योग्य आहे?

(1) कापुराचा (2) कापराचा (3) कापऱ्याचा (4) कापुरीचा

---

38. खालील शब्द समुहाकरिता पर्यायी उत्तरातील कोणता वाक्-प्रचार **योग्य** आहे?

'फार जवळ येणे.'

(1) तोंड टाकणे. (2) तोंडात बोट घालणे. (3) तोंडावर हात ठेवणे. (4) तोंडावर येणे.

---

39. खालील पर्यायातून अनुनासिकांचा **अचूक** गट ओळखा.

(1) ङ्, ण, न, म, ज्ञ (2) ङ् ञ, ण, म, क्ष (3) ङ्, ञ, ण, न, म (4) ङ्, ञ, म, सं, ज्ञ

---

40. पुढीलपैकी एक शब्द विसंगत आहे/गटाबाहेरचा आहे, पर्यायी उत्तरातून तो शब्द शोधा.

(1) संधला (2) सनला (3) संदला (4) संदिसा

---

41. 'अव्ययसाधित विशेषण' असलेले विधान पर्यायी उत्तरात कोणते आहे?

(1) बोलक्या बाहुल्यांचा खेळ सर्वांनाच आवडतो. (2) आज तुम्ही कोणत्या गावाला जाणार?

(3) बनारसी बोरे रसाळ असतात. (4) ते गव्हाचे पोते पुढच्या माळीत ठेव.

---

42. 'हात दाखवणे' या वाक्प्रचाराचा अर्थ –

(1) विजयाची खूण करणे (2) अभिवादन करणे

(3) निरोप घेणे (4) चोप देणे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

43. लेखननियमांनुसार खालील कोणता शब्द **अचूक** आहे ?

(1) उपरोल्लिखित (2) ऊपरोल्लिखित (3) उपरोल्लिखीत (4) उपरोलिखित

44. खालील गट क्रमांक 1 व गट क्रमांक 2 मधील एक जोडी चुकीची आहे, ती पर्यायी उत्तरातून शोधा.

| **गट क्रमांक 1 ( उदाहरणे )** | **गट क्रमांक 2 ( उभयान्वयी अव्यये )** |
|---|---|
| (a) म. गांधी म्हणत, की सर्वांनी सत्याने वागावे. | (i) विकल्प बोधक |
| (b) तो इतका रडला, की त्याचे तोंड सुजले. | (ii) न्यूनत्व बोधक |
| (c) यश मिळो, की न मिळो मी प्रयत्न करणार. | (iii) परिणाम बोधक |
| (d) माझा पहिला नंबर आला, की मी पेढे वाटीन. | (iv) स्वरूप दर्शक |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) - (iv) (2) (b) - (iii) (3) (c) - (i) (4) (d) - (ii)

45. 'समुद्र' या शब्दाला खालीलपैकी समानार्थी शब्द कोणता ?

(1) अर्णव (2) वडवानळ (3) खग (4) सागरवेळा

46. 'शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात'. या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

(1) शक्य क्रियापद (2) द्विकर्मक क्रियापद (3) प्रयोजक क्रियापद (4) अकर्तृक क्रियापद

47. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्दांचे लेखन **अचूक** आहे ?

(1) ज्यादा, सफेत, अंध:कार (2) महत्व, धि:कार, उत्कृष्ठ

(3) तत्व, दूसरा, ज्येष्ट (4) कोट्यधीश, घनश्याम, मदत

48. 'कमळ आणि बेडूक दोघेही चिखलात उत्पन्न झालेले म्हणजे __________ असतात'. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडा.

(1) बंधू (2) समानशील (3) पंकज (4) अंबुज

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

49. पर्यायी उत्तरांतील 'उद्गारवाचक वाक्य' ओळखा.

(1) ही मूर्ती खूप सुंदर आहे. (2) कोण म्हणतो ही मूर्ती सुंदर नाही.

(3) किती सुंदर आहे ही मूर्ती. (4) ही मूर्ती सुंदर नाही असे नाही.

50. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द देशी आहेत ?

(1) इलाखा, खुशाल, मजूर (2) घोडा, डाहळी, पोट

(3) वहाण, रक्त, तूप (4) कोठार, शेत, सोने

51. मन:पटल हा जोडशब्द खालीलपैकी कोणत्या जोडशब्दातून बनला आहे ?

(1) मन + पटल (2) मनहा + पटल (3) मनस् + पटल (4) मनो + पटल

52. जी कर्मे क्रियापदावर अधिकार गाजवणारी असतात त्यांना कोणत्या प्रकारची कर्मे म्हणतात ?

(1) अप्रत्यक्ष कर्मे (2) प्रभावी कर्मे (3) प्रत्यक्ष कर्मे (4) पूरक

53. पुढील शब्दाची संधी फोड करा.

'निरिच्छ'

(1) नि: + च्छ (2) निर: + इच्छ (3) नि: + इच्छ (4) निरी + च्छ

54. 'जो, जी, जे; जे, ज्या, जी' ही सर्वनामांची रूपे कोणत्या प्रकारातील आहेत ?

(1) दर्शक सर्वनामे (2) प्रश्नार्थक सर्वनामे

(3) संबंधी सर्वनामे (4) आत्मवाचक सर्वनामे

55. खालील शब्दातील देशी शब्द ओळखा.

(1) ढेकूण (2) सामना (3) जाहीर (4) डबा

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**पुढील उतारा वाचून त्या खालील प्रश्न क्रमांक 56 ते 60 ची उत्तरे लिहा.**

केवळ तंत्रजीवी आणि तटस्थ संशोधन भारतासारख्या गरीब देशात परवडणार नाही. काही तरी भूमिका असायलाच हव्यात संशोधनासाठी आणि संशोधकांना. 1991 पासून अर्थव्यवस्था बदलल्याबरोबर राजकारणात पालट झाला आणि त्याचा शिक्षणविषयक सर्व घटकांवर परिणाम झाला. पीएच.डी. ला प्राप्त झालेले सवंग व अगंभीर रूप गेल्या अठरा वर्षांत अधिकच उग्र झाले. औद्योगिक म्होरक्यांनी शिक्षणाचा तोंडवळा बदलायचा चंग बांधला आहे. त्यांना हवा तसा शिक्षित वर्ग ते घडवू पाहत आहेत. संशोधन काय करता व निष्कर्ष कसे काढता यापेक्षा संशोधनाचे तंत्र, भाषा, योजना कशा आत्मसात करता यांवर भर दिला जात आहे. बाजाराला त्याच्या विस्ताराच्या योजना संशोधनाशिवाय, म्हणजे 'शास्त्रोक्त' संशोधनाशिवाय, पुऱ्या करता येत नाहीत. सबब संशोधनपद्धती महत्त्वाची, निष्कर्ष तेवढे कसेही वळवून घेतले की चालते, असा छुपा कार्यक्रम बोकाळला आहे.

ॲडम स्मिथ तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते तर डेव्हिड रिकार्डो एक व्यावसायिक आणि वित्तीय अभ्यासक होते. त्यांच्यात किंचित नि:पक्षपातीपणा असल्यामुळे त्यांना भांडवलशाहीचे भलेबुरे परिणाम ज्ञात होते. परंतु अलीकडे आटापिटा कशाचा चालला आहे ? ''नवउदारवादी अर्थशास्त्र तटस्थ नसते. विषमता, बेरोजगारी,दारिद्र्य आणि वेतन याविषयीचे त्यांचे विश्लेषण अत्यंत चुकीचे व सर्व परीक्षांत नापास ठरणारे असते. तरीदेखील दरवर्षी हेच विश्लेषण दैवी सत्य असल्यासारखे कित्येक पाठ्यपुस्तकांतून अवतरत राहते.... हार्वर्ड विद्यापीठात जा किंवा युनिव्हर्सिटी ऑफ शिकागोत जा अथवा स्टॅनफर्ड विद्यापीठात जा, तुम्हाला अर्थशास्त्रातील नोबेल विजेते झळकताना सापडतील. पण या विद्यापीठात असे किमान पाच अर्थशास्त्रज्ञ शोधून दाखवा ज्यांचा नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेण्टला, जागतिक बँकेला किंवा विश्व व्यापार संघटनेला विरोध आहे. या विद्यापिठांच्या परिसरात असे पाच अर्थशास्त्री दाखवा जे कामगार संघटनेचे म्हणजे वेतन, साम्राज्यवाद यांसाठी झगडणारे व आपली कौशल्ये त्याविरुद्ध वापरणारे किंवा बालकामगार आणि अतिश्रम यांच्या समर्थनार्थ काहीही सबबी न सांगणारे संघटनांचे पाठीराखे असतील. धनाढ्य आणि बलाढ्य यांना सल्ले देण्याचे आकर्षक काम न करणारे पाच पूर्णकालीन अर्थशास्त्री प्राध्यापकही दाखवा.... शीतयुद्धाच्या हिंस्त्रपणामुळे नवउदारमतवादी अर्थशास्त्राला विरोध करणाऱ्यांना श्रोते मिळणे अशक्य होऊन बसले यात आश्चर्य काही नाही. जहाल अर्थशास्त्रज्ञांना विद्यापीठांमधून हाकलण्यात आले आणि अध्यापक म्हणून त्यांचे जिणे मुश्कील करण्यात आले. अर्थशास्त्रीय अभ्यासक्रमांमधून जहाल कल्पना हटवण्यात आल्या. तिरस्कार करण्यासाठी मात्र ठेवल्या. जहाल अर्थशास्त्र हा शास्त्राचा अभ्यास नसून पोथीबंद विचारांचा भाग आहे, असा नवउदारमतवादी अर्थशास्त्रज्ञांचा दावा होता. 1960 उजाडता अमेरिकेत पूर्णकालीन जहाल अर्थशास्त्री प्राध्यापक एकमेव होता, तो म्हणजे पॉल बरान. या बरानला पूर्णपणे एकाकी पाडण्यात आले आणि त्याचा एवढा छळ झाला की तो आजारीच पडला.''

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

56. नवउदारमतवादी अर्थशास्त्राचा कोणता दावा होता ?

(1) जहाल अर्थशास्त्र तिरस्कार करते. (2) जहाल अर्थशास्त्र निरूपयोगी आहे.

(3) जहाल अर्थशास्त्र शीतयुद्ध पेटवते. (4) जहाल अर्थशास्त्र पोथीबंद विचार आहे.

---

57. प्रस्तुत उताऱ्याचा आशय खालीलपैकी कोणत्या विषयाशी केंद्रित झाला आहे ?

(1) शीतयुद्धाचे परिणाम (2) संशोधन व नवउदारमतवादी अर्थशास्त्र

(3) प्राध्यापकांचा लहरीपणा (4) अर्थशास्त्राचा जहालपणा

---

58. बाजाराच्या विकासासाठी कोणत्या गोष्टीची आवश्यकता असते ?

(1) तंत्रजीवी संशोधन (2) शास्त्रोक्त संशोधन

(3) जहाल अर्थशास्त्र (4) आर्थिक संघर्ष

---

59. नवउदारमतवादी अर्थशास्त्र कशाचे विश्लेषण करते ?

(1) शीतयुद्धाचे (2) विषमता व बेकारी यांचे

(3) भांडवलशाहीचे (4) समाजवादाचे

---

60. प्रस्तुत उताऱ्यात प्राध्यापकांविषयीचा रोष का व्यक्त करण्यात आला आहे ?

(1) प्राध्यापक भांडवलशहांना विरोध करतात

(2) प्राध्यापक शीतयुद्ध पेटवतात

(3) प्राध्यापक शास्त्रोक्त संशोधन करतात

(4) प्राध्यापक भांडवलशाही व्यवस्थेला मदत करतात

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

61. Which one of the following two sentences is **incorrect** ?

(a) I packed my luggages.

(b) Scouts wear half pants.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

62. Substitute the underlined phrase with the best of the options below :

We <u>called on</u> him to invite him for the function.

(1) visited (2) telephoned (3) messaged (4) spoke to

---

63. Identify incorrect sentence/s :

(a) The basket of apples and pears were hanging from a hook.

(b) This must be one of the best plays that has been staged at stratford this season.

(c) Each of the candidates are well qualified.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) only (3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

64. The border incident proved to be just the <u>PROLOGUE</u> to a full-scale invasion.

Choose the best meaning of the underlined word :

(1) Provocation (2) Introduction (3) Epilogue (4) Proliferate

---

65. You <u>can</u> get hurt.

The underlined modal indicates :

(1) probability (2) ability (3) permission (4) offer

---

66. Give the meaning of phrase 'owe a debt' :

(1) pay debt (2) be in debt (3) grateful (4) debt

67. Choose a word from the given options that can be used in both the blank spaces below :

(a) It ________ all night.

(b) He ________ a cab to take him to office.

**Answer options :**

(1) rained (2) snowed (3) hailed (4) thundered

68. Which one of the following two sentences is **correct** ?

(a) Who did this ? I.

(b) He and I are brothers.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

69. Choose the correct sentence/s :

(a) He has made quite a fortune.

(b) You gave me quite a shock.

(c) He often comes to school late.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) (3) (b) and (c) (4) (c) only

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

70. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Pass down | (i) | To take place and be completed |
| (b) | Pass off | (ii) | To give to people who live later |
| (c) | Pass out | (iii) | To pay no attention to |
| (d) | Pass by | (iv) | To faint |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

71. Choose the correct passive form/s of the following sentence :

They offered my friend the captaincy.

(a) My friend was offered the captaincy.

(b) The captaincy was offered to my friend.

(c) My friend was offered to the captaincy.

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only (3) (b) and (c) (4) (a) and (b)

---

72. Identify the sentence/s containing incorrect use of preposition :

(a) The river flowed under the bridge.

(b) After the party we did a lot of washing - up.

(c) The repairs in the roof were completed quickly.

**Answer options :**

(1) (a) only (2) (c) only

(3) (a) and (b) only (4) (b) and (c) only

---

73. Which one of the following two sentences is **incorrect** ?

(a) I am learning a new poetry.

(b) Our boarding house is full.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

74. Give synonym of 'abandon' :

(1) propagate (2) adopt (3) forsake (4) dominate

---

75. Choose the correct alternative to complete the sentence :

Moral education _________ have been taught in the Universities long back.

(1) ought to (2) must (3) should (4) would

---

76. Which of the questions is/are correctly framed ?

(a) Why they are talking so loudly ?

(b) Who is she going to marry ?

(c) Who she is going to marry ?

**Answer options :**

(1) (a) and (c) only (2) (a) and (b) only

(3) (a), (b) and (c) (4) (b) only

---

77. Select one word for the following phrase :

Someone who has an excellent knowledge of languages.

(1) Interpreter (2) Translator (3) Linguist (4) Critic

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

78. Choose the suitable phrase from the following so as to bring out the correct meaning :

'not feeling well'

(1) to fall dead
(2) out of sorts
(3) lost in thought
(4) off with his hand

---

79. Choose the option to fill in the blank in the following sentence :

Radha __________ six pillow-cases since seven O'clock this morning.

(1) was making
(2) is making
(3) has made
(4) none of the above

---

80. Which of the following can be the meanings of CONSUMMATE ?

(a) Perfect

(b) Complete

(c) Goods

**Answer options :**

(1) (a) only
(2) (b) only
(3) (a) and (b) only
(4) (b) and (c) only

---

81. Choose the alternative from the following which best expresses the meaning of the given word :

PLACID :

(1) Clear
(2) Calm
(3) Enjoyable
(4) Dull

---

82. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Nullity | (i) | Unnecessary ideas, words etc. |
| (b) | Nuptial | (ii) | A man who took care of guests' horses at a small hotel |
| (c) | Otiose | (iii) | The state of being void in law |
| (d) | Ostler | (iv) | Of marriage or marriage ceremony |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

83. Read the following sentences carefully and decide on their correctness on the basis of underlined words.

(a) You should talk to your boss in a reverent manner.

(b) Our reverend principal is coming.

**Answer options :**

(1) (a) is correct
(2) (b) is correct
(3) Both (a) and (b) are correct
(4) Both (a) and (b) are wrong

84. In this question out of the four alternatives, choose the one which can be substituted for the given word/sentence :

A place where ships are loaded and unloaded.

(1) Resort
(2) Quay
(3) Scullery
(4) Refectory

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**85.** Give antonym of 'covetous' :

(a) greedy (b) avaricious (c) grasping (d) renouncing

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (c) and (d) (4) (d)

---

**86.** Which one of the following two sentences is **correct** ?

(a) He enjoyed during the holidays.

(b) I asked for my pencil but he did not give me.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**87.** Which one of the following two sentences is **incorrect** ?

(a) One of my servants tells me.

(b) Both did not go.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**88.** This journal is published <u>weekly</u>.

(Identify the part of speech underlined)

(1) Noun (2) Adjective (3) Adverb (4) Verb

---

**89.** Which of the options is closest in meaning to GENOCIDE ?

(1) Inviting a whole group of people to party

(2) Insecticide

(3) Pesticide

(4) The killing of a whole group of people

---

**90.** In this question out of the four alternatives, choose the one which can be substituted for the given word/sentence.

A resting place of wild animals.

(1) Lair (2) Kennel (3) Stable (4) Sty

---

**91.** Which one of the following two sentences is **incorrect** ?

(a) He is a tall gentleman.

(b) He took insult at this.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**92.** Use the appropriate word and fill in the blank :

A __________ of cattle/deer

(1) herd (2) heard (3) horde (4) hoard

---

**93.** Choose the incorrect sentence/s :

(a) When did you come back from Delhi ?

(b) I have passed the B.A. degree examination in 1968.

(c) I passed the B.A. degree examination in 1968.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) (3) (b) only (4) (b) and (c)

---

**94.** Choose from the following alternatives, the word which is most nearly the same in meaning ?

Anthology :

(1) prose (2) dramas (3) poems (4) stories

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**95.** Identify the correct sentence/s :

(a) Fish and chips is not my favourite meal.

(b) Pen and ink has been displaced by the ballpoint.

(c) Bread and water was the vagrant's staple diet in prison.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) only

(3) (a), (b) and (c) (4) (a) and (c) only

---

**96.** We just managed to pull the game ________.

Choose the best option to fill in the blank.

(1) Out of the fire (2) Out of the blue

(3) Out of the water (4) Out of the red

---

**97.** Select one word for the following phrase :

A person who believes in the existence of God.

(1) Theist (2) Atheist (3) Sceptic (4) Fanatic

---

**98.** Give antonym of the word 'Spiritual' :

(1) mundane (2) intangible (3) irreparable (4) uninnovative

---

**99.** He drank milk in one ________.

Complete the sentence meaningfully by choosing the correct alternative.

(1) draught (2) drought (3) draft (4) bite

---

**100.** Match the following to fill in the blanks :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | _________ we have some coffee ? | (i) | Will |
| (b) | _________ we come in ? | (ii) | Couldn't |
| (c) | _________ you take him tomorrow ? | (iii) | May |
| (d) | _________ you please post this letter for me ? | (iv) | Shall |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

- o O o -

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL